# अनैतिक मानवी वाहतूकविरोधी कायदा

## महत्त्वाच्या तरतुदी /कलमे

**कलम ३:-** कोणीही व्यक्ती, कुंटणखाणा चालविणारी व्यक्ती, जागेचा मालक, हॉटेलचा मालक, जी व्यक्ती कुंटणखाना चालविण्यास मदत करते अथवा कुंटणखान्याचा कारभार बघते ती हे सर्व ३ वर्षांच्या शिक्षेला पात्र ठरतात.

**कलम ४-** १८वर्षांखालील कोणतीही व्यक्ती, घरातील व्यक्ती, अथवा नवरा जो वेश्या व्यवसाय करणाऱ्या बाईच्या उत्पन्नावर स्वत:ची गुजराण करतो. तो दोन वर्षांच्या तुरुंगवासाच्या शिक्षेला पात्र ठरतो.

**कलम ५:-** कोणीही व्यक्ती, दलाल, हॉटेल मालक, कुंटणखाना चालविणारा अथवा गिऱ्हाईक जो वेश्या व्यवसायासाठी एखाद्या महिलेला भाग पाडणारा, घेऊन जाणारा यासारख्या कामामध्ये सहभागी असतो तो सात वर्षांच्या तुरुंगवासाच्या शिक्षेला पात्र ठरतो.

**कलम ७:-** कोणीही व्यक्ती, ग्राहक जो वेश्या व्यवसाय सार्वजनिक ठिकाणी अथवा सार्वजनिक जागेच्या जवळपास करतो तो तीन वर्षांच्या तुरुंगवासाला पात्र ठरतो.

**कलम ८:-** ग्राहक व वेश्या दोघेही हा व्यवसाय सार्वजनिक ठिकाणी अथवा सार्वजनिक ठिकाणाच्या आजूबाजूला करत असतील तर ते तीन महिन्याच्या शिक्षेला पात्र ठरतात.

**कलम ९:-** आपल्या अधिकारांचा गैरवापर करून प्रलोभन दाखवून फूस लावून, त्यास ताब्यात घेणे व वेश्या व्यवसायाला लावणे हा गुन्हा आहे. अशा व्यक्तीला जन्मठेप होऊ शकते.

**कलम १३:-** राज्य सरकारने कायद्याची अंमलबजावणीकरिता खास अधिकाऱ्याची नमणूक केलेली आहे. त्याखेरीज कायद्याच्या अंमलबजावणीकरिता अशासकीय समाज कल्याणकारी मंडळाचीदेखील नियुक्ती केली आहे.

---

**कलम १५:-** सदरील कलमाद्वारे पोलीस अधिकाऱ्यास वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिलेंची व मुलींची मुक्तता करता येते. त्याचप्रमाणे कोर्टाची परवानगी घेऊन देखील मुक्तता करता येते.

---

**कलम १७ व १७(५) :-** न्याय दंडधिकाऱ्यास वेश्या व्यवसायातून मुक्तता केलेल्या मुलींच्या सुरक्षित ताब्याची चौकशी करण्याचे अधिकार आहेत. ते करत असताना अनुभवी सामाजिक संस्थेमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची मदत घेणे अपेक्षित आहे.

---

**कलम.१७ (४):-** न्यायदंडाधिकारी किमान २ वर्षांसाठी मुक्त केलेल्या मुलींना महिला सुरक्षागृहात रवानगी करू शकतो.

## अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९८९

**कलम ३ –** वेश्या व्यवसायासाठी कुंटणखाना चालविणे अथवा चालविणाऱ्यास मदत करणे.

**कलम ४ –** वेश्या व्यवसायापासून कमाई करणे अथवा उपजीविका करणे.

**कलम ५ –** वेश्या व्यवसायासाठी मुलगी अथवा स्त्रीस पळविणे किंवा तयार करणे.

**कलम ६ –** वेश्या व्यवसाय चालविण्यासाठी स्त्री अगर मुलगी अटकावून ठेवणे.

**कलम ७ –** वेश्या व्यवसाय चालविणे.

**कलम ८ –** वेश्या व्यवसायासाठी स्त्री अगर मुलीस फूस लावणे अथवा तिला मागणी घालणे.

## स्त्री देहाचे अश्लील प्रदर्शन प्रतिबंधक अधिनियम १९८६

**कलम ३ –** अश्लील जाहिरातीच्या प्रदर्शनास बंदी, शिक्षा (कलम ६)
**कलम ४ –** स्त्रियांचा मनोभंग होईल अशा समाजाच्या नीतिमत्तेस नुकसान होईल अशा अश्लील जाहिराती प्रसिद्ध करणे, भाड्याने देणे, विकणे, अश्लील पुस्तके, लिखाण, छापणे, विक्री करणे, शिक्षा (कलम ६)

## बालविवाह प्रतिबंधक अधिनियम १९६०

**कलम ४ –** २१ वर्षांवरील व्यक्तीने लहान वयाच्या मुलीशी लग्न ठरविणे.
**कलम ५ –** लहान मुलाचे लग्न लावून देणे.
**कलम ६ –** बालविवाहाशी संबंधित आई-वडील, पालक, इतरांना शिक्षा होण्याबाबत.

## हुंडाबंदी प्रतिबंध अधिनियम १९६१

**कलम ३ –** हुंडा देणे व घेणे किंवा त्यास मदत करणे.
**कलम ४ –** हुंड्याची मागणी करणे.

## कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५

भारतीय संविधान कलम १४ अन्वये महिलांना भेदभावापासून मुक्ती कलम १५ अन्वये स्त्री-पुरुष समानता आणि २१ अन्वये जीविताचे व स्वातंत्र्याचे संरक्षण व्हावे. हा व्यापक हेतू डोळ्यांसमोर ठेवून महिलांनी कौटुंबिक अत्याचाराला बळी पडू नये. समाजामध्ये कौटुंबिक हिंसाचार घडू नये. म्हणून केंद्र शासनाने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ व नियम २००६ संपूर्ण भारतात **२६ ऑक्टोबर २००६** पासून लागू केला आहे.

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ च्या अंतर्गत न्यायदंडाधिकारी हे पीडित महिलेस त्रास देणारे पती किंवा इतर नातेवाईक या एकत्र राहणारा पुरुष साथीदार अथवा त्याचे नातेवाईक

यांच्याकडून शारीरिक, लैंगिक, आर्थिक, तोंडी किंवा भावनिक अत्याचाराने पीडित महिलांना निवासाच्या अधिकारासह तिच्या सुरक्षिततेसाठी इतर आदेश काढून ज्याद्वारे संवैधानिक अधिकार सुरक्षित करू शकतात.

शारीरिक, शाब्दिक, लैंगिक, मानसिक किंवा आर्थिक छळ हुंडा किंवा मालमत्ता देण्यासाठी महिलेला अपमानित करणे, तिला शिवीगाळ करणे, विशेषत: अपत्य नसल्यामुळे तिला हिणवणे, किंवा धमकावणे, त्रास देणे, दुखापत करणे, जखमी करणे किंवा पीडित व्यक्तीचा जीव धोक्यात आणण्यास भाग पाडणे किंवा तिच्या कोणत्याही नातेवाईकाकडे हुंड्याची मागणी करणे व वरील सर्व गोष्टींचा दुष्परिणाम पीडित व्यक्ती अथवा तिच्या नातेवाईकांवर होणे तसेच आर्थिक छळ करणे म्हणजेच महिलेने स्वत:चे उत्पन्न, स्त्रीधन, मालमत्ता किंवा इतर आर्थिक व्यवहार किंवा तिच्या हक्काच्या कोणत्याही मालमत्तेपासून तिला वंचित करणे, घराबाहेर काढणे.

**वरील कौटुंबिक हिंसाचाराच्या व्याख्येतील महत्त्वाच्या बाबी पुढीलप्रमाणे आहेत.**

१) मारहाण करणे. २) तोंडात मारणे. ३) तडाखा देणे. ४) चावणे. ५) लाथ मारणे. ६) गुद्दे मारणे. ७) ढकलणे. ८) लोटणे (जोराचा धक्का मारणे) ९) इतर कोणत्याही पद्धतीने शारीरिक दुखापत किंवा वेदना देणे.

**लैंगिक अत्याचार:-**

१) अपमान करणे. २) नावाने बोलावणे. ३) चारित्र्याबद्दल किंवा वागणुकीबद्दल संशय घेणे. ४) मुलगा झाला नाही म्हणून अपमान करणे.५) हुंडा आणला नाही म्हणून अपमान करणे. ६) तुम्हाला किंवा तुमच्या ताब्यात असलेल्या मुलाला शाळेत, महाविद्यालयात किंवा इतर शैक्षणिक संस्थात जाण्यास मज्ज्ाव करणे. ७) नोकरी स्विकारण्यास मज्ज्ाव करणे. ८) तुम्हाला किंवा तुमच्या ताब्यात असलेल्या मुलाला घरामधून बाहेर जाण्यास सांगणे. ९) नेहमीच्या कामासाठी कोणत्याही व्यक्तींबरोबर भेटण्यास मज्ज्ाव करणे. १०) तुम्हास विवाह करावयाचा नसल्यास, विवाह करण्यास जबरदस्ती करणे. ११) तुमच्या पसंतीच्या व्यक्तीबरोबर विवाह करण्यास मज्ज्ाव करणे. १२) तिच्या/त्याच्या पसंतीच्या व्यक्तीबरोबर

विवाह करण्यास जबरदस्ती करणे. १३) आत्महत्येची धमकी देणे. १४) इतर कोणतेही भावनात्मक किंवा तोंडी अपशब्द वापरणे.

## आर्थिक अत्याचार

१) हुंड्याची मागणी करणे
२) तुमचे किंवा तुमच्या मुलांच्या पालन-पोषणासाठी पैसा न देणे.
३) तुम्हाला किंवा तुमच्या मुलांना अन्न-वस्त्र, औषधे इत्यादी न पुरविणे.
४) तुम्हाला नोकरी करण्यास मज्जाव करणे.
५) नोकरीवर जाण्यासाठी अडथळा उत्पन्न करणे.
६) नोकरी स्विकारण्यास संमती न देणे.
७) तुमचा पगार, रोजगार वापरण्यास परवानगी देणे.
८) पगारातून, रोजगारातून आलेले पैसे काढून घेणे.
९) तुम्ही राहत असलेल्या घरातून हाकलून देणे.
१०) घराचा कोणताही भाग वापरण्यास किंवा घरात जाण्यास अडथळा निर्माण करणे.
११) घरातील नेहमीचे कपडे, वस्तू वापरण्यापासून रोखणे.
१२) भाड्याच्या घराचे भाडे न देणे.

## तक्रारीचा अर्ज कसा करता येईल?

मोठ्या अर्जदारांचे तक्रार अर्ज महिला सहाय्य कक्षात थेट स्वीकारले जातात. परंतु पुरुष अर्जदारांचे अर्ज तसे स्विकारले जात नाहीत. त्यासाठी पुरुष अर्जदारांना मा.पोलीस अधीक्षकांची भेट घेऊन त्यांच्याकडे अर्ज करावा लागतो. तो अर्ज कार्यालयीन टपालाद्वारे महिला साहाय्य कक्षास पुढील कारवाईसाठी प्राप्त होतो.

महिला साहाय्य कक्षात प्रत्यक्ष येऊन अर्ज देताना अर्जदार महिला सोबत असणे अनिर्वाय असते. टपालाद्वारे प्राप्त होणाऱ्या तक्रार अर्जाचीही दखल घेऊन पुढील कारवाई केली जाते. टपालाद्वारे तक्रार अर्ज पाठवतांना महिलांनी त्यावर आपला सविस्तर पत्ता, आपला किंवा

जवळच्या नातेवाईकांचा दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक, स्वत:च्या स्वाक्षरी इत्यादी गोष्टी व्यवस्थित लिहून पाठवाव्यात, जेणे करून तिला तात्काळ मदत उपलब्ध करून देता येईल.

**पुढील अपवादात्मक परिस्थितीमध्ये महिलांचा अर्ज स्विकारला जात नाही.**

- एखाद्या महिलेचे तेच प्रकरण न्यायप्रविष्ट असेल तर असा अर्ज स्वीकारला जात नाही.
- एखाद्या महिलेची प्लॉटिंग किंवा तत्सम स्थावर मालमत्ता त्यांच्यात खरेदी–विक्रीच्या व्यवहारात फसवणूक झाल्यास अशा प्रकारच्या तक्रारीत समुपदेशन करूनही मार्ग निघेलच याची शाश्वती नसल्याने तक्रार अर्ज स्वीकारले जात नाहीत.

## महिला सहायक कक्ष समितीची रचना

**जिल्हा पातळीवरील सामाजिक सुरक्षा समिती महिलांच्या प्रश्नासाठी कार्यरत असते.**

१) **अध्यक्ष** – जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक

२) **सचिव** – पोलीस उपअधीक्षक / पो.नि.ना.ह.स.

३) **सभासद** – महिला सामाजिक कार्यकर्त्या.

४) **पोलीस निरीक्षक/ पोलीस उपनिरीक्षक (स्था.गु.शा.)** याचप्रमाणे तालुका पातळीवरील पोलीस निरीक्षक यांच्या अधिपत्याखाली सामाजिक सुरक्षा समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. एक महिला पोलीस हवालदार व दोन महिला कार्यकर्त्यांचा समावेश आहे. तसेच पोलीस ठाण्यामध्ये महिला सुरक्षा समिती स्थापन करण्यात आली आहे. त्याची रचना खालीलप्रमाणे आहे.

१) **प्रमुख** – पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी.

२) **सदस्य** – पाच महिला कार्यकर्त्या.

या कार्यकर्त्या क्रियाशील जनतेच्या विश्वासास पात्र असलेल्या आणि राजकारणाशी संबंधित नसून केवळ महिलांच्या कल्याणासाठी कार्य करणाऱ्या असाव्यात. असे शासनाला अभिप्रेत आहे.